# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक १३/०८/२०१९

**केवळराम येलोरे यांच्या कुंटुंबियांना ३० लाख रुपयांचा धनादेश सुपुर्द**

दिनांक १७ मार्च २०१९ रोजी उपविभाग गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या आरमोरी पोस्टे हद्दीत पोलीस स्टेशन आरमोरीचे जवान नाकाबंदी करत असतांना एका भरधाव वाहनाने पोलीस शिपाई केवळराम येलोरे बक्कल नं. २३३८ यांना जोराची धडक दिल्याने त्यांचा मृत्यु झाला होता.

केवळराम येलोरे यांचे सॅलरी अकाउंट हे axix बँक, गडचिरोली येथील शाखेत असल्याने त्यांना ३० लाख रुपये तात्काळ मिळावेत यासाठीचा प्रस्ताव मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली तयार करुन axix बँकेकडे सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्ताव मान्य होवुन आज रोजी axix बँके तर्फे सदर ३० लाख रुपयांचा धनादेश मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़ो., श्री. श्रृष्टी रंजन नंदा (Nagpur Circle head, axix bank), शैलेश देशमुख (Nagpur head, axix bank), यांच्या हस्ते केवळराम येलोरे यांची पत्नी प्रिती केवळराम येलोरे यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला.

यावेळी मा. अपर पोलीस अधिक्षक, प्रशासन श्री. मोहितकुमार गर्ग सा़ो., श्री. अभिजित डाबिर (axix बँक ब्रांच हेड, गडचिरोली ) श्री. राकेश वल्लालवार (डेप्युटी ब्रांच हेड, axix बँक , गडचिरोली), श्री. नितेश मढई (कस्टमर सर्विस ऑफिसर, axix बँक गडचिरोली), तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


महाराष्ट्र पोलीस
वीर भोग्य
13.08.2019 13:14